वाचा: १) शासन अधिसूचना गृह विभाग क्र. बीपीए ११०५/सीआर-७/इएक्ससी-३, दि.३०.८.२००५

महाराष्ट्र शासन
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
जुने जकात घर, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३.
email :- exciseho@vsnl.net / exciseho@yahoo.com / seasdbu@indiatimes.com
Tel.No:- Jt.Commr: 2620238, Dy.Commr: 2665569, FAX No. 2662370

परिपत्रक

क्र:- सीएलआर ११२००४/एलऐबी/५ब मुंबई, १५ फेब्रुवारी २००६

पार्श्वभूमी

या कार्यालयाचे असे निदर्शनास आले आहे की, राज्यातील काही देशी मद्य उत्पादक रंगीत देशी मद्य तयार करीत असल्यामुळे देशी मद्यास विदेशी मद्याप्रमाणे रंग येत असल्यामुळे मद्य पिणारा ग्राहक तिकडे आकर्षित झाल्यामुळे साहजिकच विदेशी मद्याची विक्री कमी झाल्याने शासनाच्या महसुलावरही विपरीत परिणाम होत होता त्यामुळे शासन अधिसूचना गृह विभाग क्र. बीपीए ११०५/सीआर-७/इएक्ससी-३, दि.३०.८.२००५ अन्वये देशी मद्याच्या व्याख्येमध्ये बदल करण्यात आला असून रंगीत देशी निर्मितीवर निर्बंध घालण्यात आले असून फक्त रंग विरहित देशी दारुची निर्मिती करणे बंधनकारक करण्यात आले आहे. असे असतानाही सुध्दा अद्यापी काही घटक त्यातून पळवाट काढण्याकरीता देशी मद्य पारदर्शक बाटल्यामध्ये न भरता ते मुद्दामच अपारदर्शक (Frosted) बाटल्यात भरुन देशी मद्याची विक्री करीत आहेत तसेच देशी मद्याकरीता (उदा:पंच,८३एट) व परात येणा-या अर्क-स्वादाशी विदेशी मद्याकरीता (उदा. व्होडका, जीन,इ.) वापरात येणा-या अर्क-स्वाद यामध्ये साम्य असल्यामुळे त्यातून उत्पादित झालेले देशी मद्य हे जरी रंगहिन दिसत असले तरी त्यामध्ये पाण्याचे मिश्रण केल्यानंतर ते पांढरा गढूळ (Turbid) होऊन जीन, व्होडका यासारख्या विदेशी मद्यासदृष्य होऊन ग्राहकांची फसवणूक होते व अनावधानाने शासनाच्या महसुलावरही विपरित परिणाम होत असल्याचे निदर्शनास येते.

तसेच काही देशी मद्य उत्पादक हे "देशी दारु" हे शब्द ब्रॅन्डच्या नावापेक्षा मोठ्या आकारात छापणे आवश्यक असतानाही हे शब्द ब्रॅन्डच्या नावापेक्षा लहान आकारात छापत आहेत त्यामुळे वरील देशी मद्य हे विदेशीमद्य असल्याच्या भासामुळे ग्राहकांची फसवणूक होते. देशी

मद्यावरील उत्पादन शुल्क हे विदेशी मद्यावरील उत्पादन शुल्काच्या १/३ एवढे कमी असल्याने राज्याच्या महसुलाचेही यामध्ये नुकसान होत असते. तसेच या कार्यालयाचे काही देशी मद्य उत्पादक १०० मि.लि. च्या बाटलीत ९० मि.लि. मद्य भरुन विक्री करित आहे. त्यामुळे शासनाचा महसुलात विपरित परिणाम होत आहे. त्याकरिता दिनांक २३.१.२००६ रोजी सर्व सीएल-१ अनुज्ञप्तीधारकांची बैठक बोलविण्यांत आली होती सदर बैठकीत अनुज्ञप्तीधारकांच्या संमतीने असा निर्णय घेण्यांत आला की १०० मि.लि. च्या बाटली वापरणार नाहीत व त्याऐवजी ९० मि.लि. चे बाटल्या वापरतील. तसेच ९० मि.लि. च्या ५० बाटली किंवा १०० बाटली चे एक केस बनवून विक्री करिता प्रस्तावित केल्यानुसार मान्य करण्यांत आले आहे.

२. वरील पार्श्वभूमी चा विचार करून लेबल्सच्या माध्यमातून होणारे राज्य उत्पादन शुल्काचे नुकसान वाचवणे व ग्राहकाची फसवणूक थांबविणे आवश्यक आहे.

३. उपरोक्त बाबी लक्षात घेता ग्राहकांची फसवणूक होऊ नये तसेच शासनाच्या महसुलावर विपरित परिणाम होऊ नये म्हणून सदर परिपत्रकान्वये खालील प्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

i. फक्त सफेद (colourless and transparent) बाटल्यांचा वापर देशी मद्य निर्मितीकरिता करण्यांत यावा. Frosted(अपारदर्शक) व रंगीत (Coloured) bottle चा वापर यापुढे देशी मद्य निर्मितीची करता येणार नाही.

ii. देशी मद्य रंगविरहीत असल्यामुळे, त्यात पाणी व लिंबू पंच इत्यादी अर्क घातल्यानंतरही हे मद्य गढूळ (Turbid) राहणार नाही याची काळजी सर्व उत्पादकांनी घ्यावी लागेल.

iii. यापुढे १०० मि.लि. च्या बाटल्यांचा वापर करता येणार नाही.

iv. ९० मि.लि. चा ५० बाटल्यांचा एक केस किंवा १०० बाटल्यांचा एक केस करु शकतील. तसेच इतर साईझेस साठी पूर्वीची १२/२४/४८ बाटल्या/केस ही पध्दत सुरु राहील.

v. देशी दारु हे शब्द, ब्रॅन्ड नावापेक्षा मोठे व ठळक अक्षरात छापणे.

vi. देशी दारु चे लेबलवर इंग्रजी लिपिचा वापर करता येणार नाही.

आपणाकडे सध्या शिल्लक असलेल्या रंगीत तसेच Frosted बाटल्यातील मद्याचा साठा व अशा रंगीत तसेच Frosted रिकाम्या बाटल्यांच्या साठयांचा तसेच सध्या मंजूर असलेल्या सर्व लेबलचा साठयाची वापर करण्यास दिनांक ३१.३.२००६ पर्यंत परवानगी देण्यात येत आहे. तसेच दिनांक १.४.२००६ रोजी शिल्लक रंगीत बाटल्यातील देशी मद्याचा साठा तसेच अपारदर्शक (Frosted) बाटल्यांचा साठा तसेच सध्या मंजूर असलेल्या सर्व लेबलचा साठयाची आपल्या प्रभारी अधिकाऱ्यांना कळविण्यात यावा. दिनांक १.४.२००६ पासून सुधारीत सुचनांनुसार रंगहिन तसेच अपारदर्शक बाटल्यांचा व लेबलचा वापर करुन देशी मद्य निर्मिती करणे आवश्यक राहील याची नोंद घ्यावी.

(सी.एस.संगीतराव)
आयुक्त
राज्य उत्पादन शुल्क
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१. सर्व सीएल-१ अनुज्ञप्तीधारक
२. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
३. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
४. सर्व राजपत्रित अधिकारी
५. सर्व सीएल-१ अनुज्ञप्तीधारकाचे प्रभारी अधिकारी
५. या कार्यालयाचे सर्व कार्यसन अधिकारी
६. अभिलेख शाखा (५ प्रती)

—— ०×० —— ×०× —— ×०× ——

क्र. सीएलआर. ११००६/उ.अ./५२/०६ दि. २५/२/००६

मे. निफाड स.सा.का.लि. आसवनी यांच कडे माहिती साठी व योग्य त्या कार्यवाही साठी रवाना.

२. उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी.

उप अधीक्षक
राज्य उत्पादन शुल्क
निफाड स.सा.का.लि.

Recd on 27/2/06

D:\backup\lwp\cl bottle and label note and cir